**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामदास बाबुराव लांघी
घर नं.१६३५, गडावर खंडोबा मंदिराशेजारी,
महाद्वाराचे उजव्या बाजूला, श्री क्षेत्री जेजुरी,
ता. पुरंदर, जि. पुणे
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुरंदर
ता. पुरंदर, जि. पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.४.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रामदास बाबुराव लांघी
घर नं.१६३५, गडावर खंडोबा मंदिराशेजारी,
महाद्वाराचे उजव्या बाजूला, श्री क्षेत्री जेजुरी,
ता. पुरंदर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे श्री. एस.व्ही. चंदनशिवे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

आपण खंडोबाचे पुजारी असून आपले घर पाडण्याच्या संदर्भात माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रामदास बाबुराव लांघी यांनी केली.

श्री. लांघी यांचे घर जेजुरी हद्दीत येते, ते अतिक्रमण असल्यामुळे काढण्यात आले. त्याबाबतची माहिती त्यांना देण्यांत आली आहे. अतिक्रमण का काढले, अशी विचारणा ते सातत्याने करीत आले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर यांनी केले. श्री. लांघी यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ ची माहिती देवस्थान ट्रस्ट व धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून मिळू शकेल, असे श्री.लांघी यांना यापूर्वीही कळविण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले.

अतिक्रमणाबाबतच्या कार्यवाही विषयीचे पत्र अपीलकर्त्यास द्यावे, तसेच मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भातील माहिती उपलब्ध करून देण्याबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर श्री. एस.व्ही. चंदनशिवे यांनी दि. १२.११.२००९ च्या पत्रान्वये धर्मादाय आयुक्त कार्यालयास कळविल्याचे आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १९.११.२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. वसंत जगन्नाथ माळकर
शिवम, स्वप्ननगर हौ.सो.,प्लॉट नं.११७,
सेक्टर नं.११, पंचवटी कॉम्प्लेक्स नजीक,
धनकवडी -चव्हाणनगर रोड, (पद्मावती) पुणे-४३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, सोमवार पेठ, गंजी गल्ली,
हत्तीमहल, जि. कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
नगरपरिषद शिक्षण मंडळ, सिध्देश्वर मार्केट,
सिध्देश्वर चौक, तासगाव,ता.तासगांव, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७३+ २०७४+ २०७५ / पुणे |
| २ | सनावणीची तारीख | दि. १९.६.२००६ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. वसंत जगन्नाथ माळकर
शिवम, स्वप्ननगर हौ.सो.,प्लॉट नं.११७,
सेक्टर नं.११, पंचवटी कॉम्प्लेक्स नजीक,
धनकवडी -चव्हाणनगर रोड, (पद्मावती) पुणे-४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, सोमवार पेठ, गंजी गल्ली,
हत्तीमहल, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. पी.जी. साठे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
नगरपरिषद शिक्षण मंडळ, सिध्देश्वर मार्केट,
सिध्देश्वर चौक, तासगाव,ता.तासगांव, जि. सांगली

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २०७३ / पुणे | १२.१२.२००७ | ५.१.२००८ | २९.०१.२००८ | १४.२.२००८ |
| २०७४ / पुणे | २०.११.२००७ | २६.१२.२००७ | ३१.१२.२००७ | १०.२.२००८ |
| २०७५ / पुणे | १९.१०.२००७ | १२.११.२००७ | ४.१२.२००७ | २५.१.२००८ |

## विवेचन

आपण मागणी केलेल्या माहितीपैकी केवळ दोन मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधीची रक्कम याबाबत केलेल्या कार्यवाहीत अनेक त्रुटी असून त्याबाबतच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. वसंत जगन्नाथ माळकर यांनी केले. या त्रुटींबाबतचे तपशीलवार लेखी निवेदन त्यांनी सादर केले.

श्री. माळकर सातत्याने एकच विषय विविध अर्जाद्वारे मांडत आले आहेत. त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. स्वत: केलेल्या अर्जांच्या प्रती ते सातत्याने मागतात व त्याही त्यांना देण्यात आल्या आहेत. अपंग सेवक शिक्षकांच्या बदली बाबतचा शासन निर्णय मिळण्याबाबतचा त्यांचा आग्रह आहे. परंतु त्यांना वेळीच कळविले आहे. आतापर्यंत त्यांनी नऊ अर्ज केले आहेत. दुबार सेवा पुस्तक देण्यासारखी प्रशासकीय कार्यवाही करण्याबरोबर भविष्य निर्वाह निधी आर्दी बाबतच्या त्यांच्या शंकांचे उत्तरही दिलेले आहे. आपण दिलेल्या नमुन्यातच तपशीलवार माहिती मिळाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगर परिषद शिक्षण मंडळ, सिध्देश्वर श्री. पी.डी. कुंभार यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री. माळकर यांनी वेळोवेळी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे. भविष्य निर्वाह निधीतील रक्कम जमा नसणे आदी तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा भाग नाही. अपंग शिक्षण सेवकांच्या बदलीबाबतच्या शासन निर्णयाचा शोध घेऊन अपीलकर्त्यास ८ दिवसात त्याबाबत कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी

दिले. त्यानुसार आपल्या कार्यालयात तसेच जिल्हा परिषदेकडेही अशा शासन निर्णयाचा शोध घेऊन प्रत उपलब्ध झालेली नाही. इतर कार्यालयांकडेही याबाबत चौकशी करीत आहोत, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी श्री. पी.डी. कुंभार यांनी दि.१३.११.२००९ च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. चितळी आणण्पा सिध्दप्पा
१०७ बी, न्यू संतोष नगर, सोलापूर -४१३ ००४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जि. सोलापूर श्री. अशोक भांडवलकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर श्री. सुनिल शिरापूरकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००७ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती चौंडेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सोलापूर या संस्थेशी संबंधित असून ती संस्थेकडून घेण्याबाबत त्यांना कळविले. तसेच माहिती देण्याबाबत संस्थेलाही कळविले. त्यानंतर त्यांनी संस्थेशी संपर्क साधला नाही. आपल्या कार्यालयाकडील माहिती त्यांना पुरविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री. सुनील शिरापूरकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. के. एस. एम. भट
व्दारा डॉ. मिनाक्षी एम.,
"प्रोफेसर हेड डिपार्टमेंट इन्स्ट्रयूमेंटल,
इन्स्ट्रयूमेटेशन अँड टेक्नॉलॉजी,
३ रा मजला", डॉ. आंबेडकर इन्स्टिटयूट
ऑफ टेक्नॉलॉजी (डॉ. ए. आय. टी.),
नगराभावी, पोस्ट मल्लाथली,
बेंगलोर - ५६ (कर्नाटक)

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अतिरिक्त संचालक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
पुणे - ५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
पुणे - ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१४० / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.८.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.९.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.९.२००७ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - सोबत मूळ माहिती-मागणी अर्जाची प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. के. एस. एम. भट यांना त्यांचे मूळ अर्जानुसार जन माहिती अधिकरी तथा प्रशासन अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांनी माहिती दिली. परंतु सेवा जेष्ठता यादी जाहीर करण्यापूर्वी मला (श्री. भट) दाखविली होती का ? त्यावर माझी सहमतीदर्शक स्वाक्षरी घेण्यात आली आहे का ? अशी विचारणा श्री. भट यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये केलेली आहे. ज्येष्ठता यादीमध्ये त्रुटी असून ज्येष्ठता यादी बरोबर नाही, असा आक्षेप त्यानंतर नोंदविला. अशा प्रकारची विचारणा व आक्षेप याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखल घेता येणार नाही, या आक्षेपांचेही लेखी स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, भूजल आणि विकास यंत्रणा, पुणे यांनी अपीलकर्ता श्री. भट यांना दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि.३० -११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. दगडू बाबूराव शिंदे
२१ / अे, लक्ष्मी पॅलेस, औंधगाव,
गुरुव्दारा जवळ, पुणे - ७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** नगर रचनाकार,
पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६० / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.०४.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.०५.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.०६.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.०७.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - मौजे रहाटणी, ता. हवेली येथील स. नं. ३३/१/३/१ या जमिनीचा वापर कोणत्या कारणासाठी करता येतो, या विषयीचा खुलासा व सदर जमिनीच्या झोन दाखल्याची सत्यप्रत. | |

**विवेचन**

दिनांक २३.१२.२००८ रोजीच्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जनमाहिती अधिकारी तथा नगर रचनाकार श्री. अनिल शंकर काळे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुहास दिवसे हजर होते. अपीलकर्ता गैरहजर होते.

श्री. शिंदे यांनी मागणी केलेली माहिती वेळेत देण्यात आली आहे. भाग नकाशासाठी रु. ५०/- भरण्याबाबत कळविले आहे. तसेच सदर नकाशा प्राधिकरणाच्या www.pentda.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे जनमाहिती आधिकारी तथा नगर रचनाकार श्री. अनिल शंकर काळे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. सुहास दिवसे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

अपीलकर्त्यांने 'झोन दाखला' मागणी केली असून महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार असे दाखले प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. अशा नकलांची मागणी महितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करण्यापेक्षा अपीलकर्त्याने प्रचलित नियमावलीनुसार त्यासाठी अर्ज करुन त्याप्रमाणे विहित केलेले शुल्क भरुन घेणे उचित ठरले असते. तथापि अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास तसे शुल्क भरुन घेऊन ही प्रत जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार श्री. अनिल शंकर काळेत्यांना देऊ शकतील.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.१७-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामचंद्र दतात्रय घुगे
गंगाधाम, फेज-१, फ्टॅट नं.डी-२०४,
मार्केटयार्ड, पुणे-३७

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक (पी),
गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे पथक, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे पथक, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रामचंद्र दतात्रय घुगे
गंगाधाम, फेज-१, फलॅट नं.डी-२०४, मार्केटयार्ड, पुणे-३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक (पी),
गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे पथक, पुणे-१ श्री. शरद रा.शेलार

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे पथक, पुणे-१ श्री. पी.बी.सोनवणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.६.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या विरूध्द दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासातील कागदपत्रे, तपास चालू असल्याच्या कारणावरून देण्यात आली नाहीत. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल असल्यामुळे आता ही कागदपत्रे द्यावीत, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रामचंद्र दत्तात्रय घुगे यांनी केली.

श्री. घुगे हे माजी पोलीस निरीक्षक असून गुन्ह्यातील ७-८ आरोपींचा तपास अद्याप पूर्ण व्हावयाचा आहे, त्यामुळे माहिती दिली नाही. गेल्या २-३ वर्षांपासून तपास चालू आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक श्री. पी.बी.सोनवणे यांनी केले. या प्रकरणात केवळ श्री. घुगे हेच आरोपी नसून अन्य आरोपींचा समावेश आहे, त्यामुळे कागदपत्रे दिली नाहीत, असे अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक (पी), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे श्री. शरद रा. शेलार यांनी सांगितले.

श्री. घुगे यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले असून दाव्याचे कामकाज सुरु झाले आहे. त्यामुळे योग्य ते शुल्क आकारून त्यांना सर्व कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात, तसेच प्रकरणातील कागदपत्रांची संपूर्ण पाहणी करू देऊन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. घुगे यांना माहिती देण्यात आल्याचा अहवाल पोलीस अधीक्षक (पी), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे श्री. शरद शेलार यांनी आयोगाला सादर केला. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार विहित मुदतीत माहिती देण्याची पूर्तता करणे आवश्यक असल्याची जाणीव जन माहिती अधिकारी श्री. पी.बी. सोनवणे व अपिलीय प्राधिकारी श्री. शरद शेलार यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.धोंडीराम दत्तात्रय माळी
कळमण, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
ता. व जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
ता. व जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २० .११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धोंडीराम दत्तात्रय माळी
कळमण, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

समाजसेवेचा भाग म्हणून आपण सातत्याने विविध स्वरूपाचे अर्ज करीत असतो. शिक्षक व संस्थाचालक असलेल्या व्यक्ती सरपंच म्हणून काम करतात व एकाच वेळी शिक्षकांचे आणि सरपंच पदाचे मानधन घेतात. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आपण केली होती. त्याची माहिती दिली जात नाही व चौकशी झाली असल्यास अहवालाची प्रतही दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.धोंडीराम दत्तात्रय माळी यांनी केले.

श्री.माळी यांनी लोकशाही दिनात तक्रार केली होती. शिक्षण विभागामार्फत चौकशी करू नये असे त्यांनी कळविले होते. त्यामुळे शिक्षण विभागाने चौकशी करून अहवाल सादर करण्याचा प्रश्न येत नाही, त्यांना आवश्यक असल्यास त्यांनी याबाबत न्यायिक मार्गांचा अवलंब करावा,असे त्यांना कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.के.सगरे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३०.११ २००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुगतपाल विश्वनाथ कांबळे
१९३, रेल्वे लाईन्स, फॉरेस्ट, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि---- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** जानेवांरी १९९३ ते मार्च १९९४ पर्यत किती शाळांची मान्यता काढून घेण्यात आली त्या शाळांची यादी, मान्यता काढून घेण्याचे निकष,मान्यता काढून घेताना शाळांशी केलेला पत्रव्यवहार व वरिष्ठांशी केलेला पत्रव्यवहार या संबंधीच्या नकला, उत्तर सोलापूर तालुक्यात फेब्रुवारी २००१ मध्ये ज्या शाळांना अनुदान दिले त्या शाळांमध्ये जुन १९९९ ते डिसेंबर २००२ पर्यत किती पदे मंजूर आहेत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २९.१०.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.सुगतपाल विश्वनाथ कांबळे यांनी जानेवारी १९९३ पासूनची माहिती मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.जी.हाके यांनी उत्तर दिले नाही. तसेच प्रथम अपिलाची सुनावणीही झालेली नाही व निर्णयही दिला गेला नाही, असे श्री.कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात नमूद केले आहे.

श्री.कांबळे यांनी मागितलेली माहिती जुनी असल्यामुळे प्राप्त करून घेऊन तयार ठेवली होती. दि.३.१२.२००७ च्या पत्रानुसार तसे त्यांना कळविले होते. त्यांच्याकडून उत्तर आले नाही. परंतु 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे समक्ष देता आली नाही, म्हणून टपालाने माहिती पाठविली, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी नमूद केले.

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) माहिती जुनी असली तरी ती देण्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.जी.हाके यांनी कोणती कार्यवाही केली याबाबतचा खुलासा दि.३०.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. श्री.हाके यांना याबाबत कळविण्याची जबाबदारी विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.एम.एन.वीर यांची राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक २४.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गोटीराम रामभाऊ चव्हाण
संतोष निवास, डिकसळ, पो.कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोटीराम रामभाऊ चव्हाण
संतोष निवास, डिकसळ, पो.कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ, जि.पुणे श्री.सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मावळ, जि.पुणे श्री.किशोर घाडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.३०.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला विलंबाने माहिती दिली, परंतु पूर्वीची तारीख टाकण्यात आली. तसेच माहितीसाठीचे शुल्क आल्याला न कळविता परस्पर कार्यालयाने का भरणा केला, हे आपल्याला कळले नाही. माहिती मिळाली आहे, विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, जि.पुणे यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.गोटीराम रामभाऊ चव्हाण यांनी केली.

टपालावरील तारखांची नोंद व विलंब याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, जि.पुणे श्री.किशोर घाडगे यांनी एक आठवड्यात करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.किशोर घाडगे यांनी श्री.चव्हाण यांना विहित मुदतीत त्यांनी शुल्क भरल्याने माहिती पुरविण्यात आल्याचा खुलासा दि.७.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल सुखदेव शिंदे
बुधवार पेठ, शिंदे सदन, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर (अ.क्र.२३०)
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, सोलापूर (अ.क्र.२३१)
(१)**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०+२३१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विठ्ठल सुखदेव शिंदे
बुधवार पेठ, शिंदे सदन, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर (अ.क्र.२३०)श्री.प्रशांतसिंह प्रकाशसिंह मरोड
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, सोलापूर (अ.क्र.२३१) श्री.ए.ए.चंदरगी

| | | |
|---|---|---|
| (१)**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर श्री.अे.अे.चंदरगी | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.६.२००६ ६.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.६.२००६ व २६.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.६.२००८ व १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

विहित मुदतीपेक्षा उशिरा, परंतु पत्रावर आधीची तारीख टाकून माहिती दिली. जिल्हा परिषदेने सन १९७९ मध्ये आपल्याला दिलेल्या जागेत आपण शेड बांधली होती. मुलगा मयत नसताना सन १९८० साली मयत दाखवून त्यांच्या पत्नीला वारस ठरवून जागा विकण्याचा बेकायदेशीर व्यवहार त्यावेळच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने केला. त्या जागेतील अतिक्रमण हटविले पाहिजे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विठ्ठल सुखदेव शिंदे यांनी केली.

श्री.शिंदे यांनी संबंधित प्रकरणातील कार्यवाहीची माहिती मागितली होती. ती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली. जवळजवळ २५० अतिक्रमणे असून ती काढणे हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अतिक्रमण असल्यामुळे त्याबाबतची कार्यवाही ग्रामपंचायतीने करावी लागेल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर श्री.अे.अे.चंदरगी यांनी केले. अतिक्रमणाची संख्या, व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न या बरोबरच संबंधित विभाग महामार्गाला लागून असून बाजारपेठेचा आहे. त्यामुळे अतिक्रमण काढण्याबाबतची कार्यवाही करता आली नाही, असे

प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह प्रकाशसिंह मरोड यांनी केले. श्री.शिंदे यांना त्यांच्या मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. परंतु अतिक्रमण हटविण्याची त्यांची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची बाब असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर श्री.अे.अे.चंदरगी व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह प्रकाशसिंह मरोड या दोघांनीही केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. शंकर भगवान काळे
मु.पो.पळसदेव, ता.इंदापूर, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर निबंधक (अं.व.नि.)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था,
सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१२ / पुणे |
| २ | सनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. शंकर भगवान काळे
मु.पो.पळसदेव, ता.इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर निबंधक (अं.व.नि.)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. एम.बी.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था,
सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. ल. बा. काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जा माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१.२००८ |
| ५ | जा माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेश देऊनही पूर्ण माहिती दिली गेली नाही. देऊ केलेली माहिती शिपायामार्फत पाठविण्यात आली होती, परंतु ती तपासून घेतल्याशिवाय स्वीकारता येणार नसल्याचे आपण स्पष्ट केले. सन २००० ते २००६ या काळातील ऑडिट मेमोत दुरुस्ती केली नाही व त्याबाबतची माहितीही दिली नाही. तसेच विहित मुदतीत माहिती न देऊनही शुल्काची मागणी केल्यामुळे माहिती घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. शंकर भगवान काळे यांनी केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणी केलेली नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे फलक लावलेले नाहीत, अशी तक्रारही श्री. काळे यांनी केली.

श्री. काळे यांनी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांनी तो जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्याकडे पाठविला. त्या कार्यालयाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर यांच्याकडे पाठविला. अर्जातील माहिती पळसदेव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित नंबर १ व नंबर २ यांच्याकडील असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे पाठविला. त्यांनी विहित मुदतीत शुल्क कळविले. व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर यांनी कार्यालयाकडील उपलब्ध माहिती श्री. काळे यांना दिली, तशी त्यांची पोहच आहे. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे श्री. काळे यांनी अपील केले. त्यांच्या आदेशानुसार देऊ केलेली माहिती आपल्या कार्यालयाकडून न घेता संस्थेकडूनच घेऊ, अशी भूमिका श्री. काळे यांनी मांडली. संस्थेने शिपाई पाठवून देऊ केलेली माहिती त्यांनी स्वीकारली

नाही, म्हणून रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, तीही त्यांनी स्वीकारली नाही. संस्था व आपले कार्यालय त्यांना हवी असलेली कोणतीही माहिती देण्यास तयार आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था श्री. ल. बा. काळे यांनी केले.

श्री. काळे यांनी अनेक अर्ज केले असून त्यांच्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आली आहे. संस्थेने कळविलेले शुल्क भरले नाही, तरीही माहिती देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी ती स्वीकारली नाही. ऑडिट मेमोतील दुरुस्तीसह त्यांच्या अन्य मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ बाबतची माहितीही त्यांना देण्यात आली, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एम.बी. पवार यांनी केले.

श्री. काळे यांना विविध विभागाकंडून माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केला आहे. देऊ केलेली माहिती न स्वीकारण्याची त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २१.११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. दत्तात्रय माधव हेगडकर
३४/२, रघुवंश आपार्टमेंट, फ्लॅट नं. ९,
फालेनगर, भारती विद्यापीठ, पुणे - ४६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.११.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.२.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.२.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १५.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' या अपिलाचा समावेश होता. या कार्यक्रमातील प्रपत्रात अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी अपीलकर्त्याच्या अपिलाच्या अनुषंगाने पुनःश्च सुनावणी घेऊ, असे नमूद केले.

श्री. हेगडकर यांच्या अपिलाच्या सुनावणीनंतर दि. ४.८.२००९ रोजी त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अगोदर मुख्याध्यापक, कै. कॅ. शिवरामपंत दामले प्रशाला, पुणे - ३० यांनी दि. ३१.३.२००९ रोजी माहिती दिलेली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी दि. ८.१०.२००९ रोजीच्या पत्राने नमूद केले. आपल्याला योग्य माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री. हेगडकर यांनी नंतरही केली. परंतु माहितीत नेमके काय अयोग्य आहे, हे स्पष्ट केलेले नाही. तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी श्री. हेगडकर यांच्या मूळ अर्जानुसार माहिती दिल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कुंडलिक श्रीरंग काजळे
मु.पो.निरगुडे, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत निरगुडे, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.आर.एम.साळुंके

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत निरगुडे, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.ए.आर.बनसोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

माहितीसाठी आपल्याला कळविलेले शुल्क जास्त असल्याची अपीलकर्ता श्री.कुंडलिक श्रीरंग काजळे यांची तक्रार आहे. मात्र शुल्काबाबत विहित मुदतीत कळवून योग्य शुल्क आकारून पूर्ण माहिती दिलेली आहे. माहिती प्रमाणित केली नसल्याची तक्रार श्री.काजळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे. तथापि मूळ अर्जात माहिती प्रमाणित करून देण्याची मागणी त्यांनी केली नव्हती. श्री.काजळे यांनी ग्रामपंचायतीच्या गावठाण जागेत अतिक्रमण केले असून ग्रामपंचायतीने त्यांना नोटिसा बजावल्यामुळे हेतुपुरस्सर त्रास देण्यासाठी ते अशा प्रकारे अर्ज व अपिले करीत आहेत. मूळ अभिलेख त्यांना दाखविण्याची तयारीही आयोगाच्या निदेशानंतर कळविली होती, तथापि ते अवलोकनासाठी आले नाहीत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत निरगुडे, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.ए.आर.बनसोडे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.आर.एम.साळुंके यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि२७.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भरत बजरंग बल्लाळ
४, संजीवनी प्लाझा, डावी भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
यशवंतराव मोहिते महाविद्यालय, एरंडवणा, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
यशवंतराव मोहिते महाविद्यालय, एरंडवणा, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२+३७६+६७६+१५६३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भरत बजरंग बल्लाळ
४, संजीवनी प्लाझा, डावी भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
यशवंतराव मोहिते महाविद्यालय, एरंडवणा, पुणे डॉ.उत्तम भोईटे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
यशवंतराव मोहिते महाविद्यालय, एरंडवणा, पुणे श्री.के.डी.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.९.२००६, दि.३.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००६, दि.२९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.१०.२००६, दि.२८.१२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

भारती विद्यापीठात झालेली आपली दोन वर्षाची सेवा सलग समजण्यात यावी यासाठी आपण माहिती मागितली होती. आपल्या दि.२५ सप्टेंबर १९९८ च्या मान्यतेची प्रत विद्यापीठाने प्राचार्यांच्या नावे काढली, ती आपल्याला मिळाली नाही, ती मिळावी. आपल्या स्वतःच्या कामाचा फायदा आपल्याला मिळावा एवढीच आपली मागणी आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भरत बजरंग बल्लाळ यांनी केले.

श्री.बल्लाळ यांनी विविध अर्जांद्वारे मागितलेली माहिती वेळोवेळी त्यांना देण्यात आली असून, त्यांच्या मूळ मुद्दयांचे निराकरणही करण्यात येत आहे. त्यांची पूर्वीची सेवा ग्राह्य धरून शासनाला प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही करीत आहोत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, यशवंतराव मोहिते महाविद्यालय, एरंडवणा, पुणे यांनी केले. मान्यतेच्या मूळ प्रतीची सत्यप्रत श्री.बल्लाळ यांना देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ही प्रत मिळत असल्यामुळे आपण आपली सर्व अपिले मागे घेत असल्याचे लेखी निवेदन श्री.बल्लाळ यांनी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती भारती सुरेश बडोदकर
द्वारा-श्री.शिवाजी महादेव गौड
प्लॉट नं.१३२, ए वॉर्ड, शिवप्रसाद निवास, फलेवाडी, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर शहर, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर शहर, दुधाळी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती भारती सुरेश बडोदकर
द्वारा-श्री.शिवाजी महादेव गौड
प्लॉट नं.१३२, ए वॉर्ड, शिवप्रसाद निवास, फलेवाडी, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग,
कोल्हापूर शहर, कोल्हापूर श्री.वि.मा.कुल्लूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग,
कोल्हापूर शहर, दुधाळी, कोल्हापूर श्री.विलास तडकोड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

श्रीमती लक्ष्मीबाई बडोदकर व श्री.डी.एम.पाटील यांच्या भागीदारीत असलेल्या 'डायमंड वाईन्स' या दुकानाच्या अनुज्ञप्ती संदर्भातील आपण मागितलेली कागदपत्रे मिळाली नाहीत, असे अपीलकर्त्या श्रीमती भारती सुरेश बडोदकर यांनी नमूद केले. श्रीमती बडोदकर यांनी मागितलेली माहिती सुमारे २० वर्षांपूर्वीची असून भागीदारी संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध नाहीत, असे त्यांना कळविण्यात आले व अनुषंगिक माहिती देण्यात आली. माहितीच्या मागणीचा अर्ज आपण गैरसमजातून केला होता व सर्व माहिती मिळाली असल्यामुळे अपील मागे घेत आहे, असे दि.१.७.२००८ रोजी त्यांनी लेखी दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा

उपअधीक्षक, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर शहर श्री.विलास तडकोड यांनी श्रीमती बडोदकर यांनी उपरोक्त पत्राच्या प्रतीसह केले. मूळ कागदपत्रांचा शोध घेऊन सापडल्यास दिले जातील, असे त्यांनी नमूद केले.

श्रीमती बडोदकर यांच्या मूळ अर्जानुसार संबंधित सर्व संचिका त्यांना अवलोकनासाठी उपलब्ध करून द्याव्यात व त्यातील आपश्यक असलेली माहिती निःशुल्क द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१९.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**